॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
अशक्य काहीच नसते.
केवळ आपली इच्छाशक्ती हवी.

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# १५ ऑगस्टपासून कॉकरोचचा मोर्चा सरकारी शाळेकडे

## अभिजीत दिपके यांनी व्हीडीओद्वारे दिली अभियानाची माहिती

**नवी दिल्ली । वीरभूमी –** गावागावातील सरकारी शाळांची दुरवस्था आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांकडे होणारे दुर्लक्ष याविरोधात कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) देशव्यापी अभियान सुरू करण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी येत्या १५ ऑगस्टपासून या अभियानाला सुरुवात केली जाणार असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच नागरिक, पालक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अभिजीत दिपके यांनी व्हीडीओद्वारे या अभियानाची माहिती दिली. महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील त्यांच्या गावापासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात येणार असून गावातील सरकारी शाळांची सद्यस्थिती सुधारण्यासाठी ते स्वत: सरपंचांशी संपर्क साधणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर देशभरातील इतर गावांमध्येही या उपक्रमाचा विस्तार करण्याचे सीजेपीचे नियोजन आहे. १५ ऑगस्ट हा भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन आहे. स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याचे दिपके यांनी सांगितले. देशात मोठ्या पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना गावातील सरकारी शाळांसाठी पुरेशा



सुविधा का निर्माण होऊ शकल्या नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ग्रामीण भागातील अनेक मुलांना आजही शाळेत जाण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याचा दावा दिपके यांनी केला. शेतकरी आणि कामगारांच्या मुलांनाही देशाच्या भविष्यातील पीढी म्हणून समान संधी मिळायला हवी, असे त्यांनी म्हटले.

या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या अभियानाचा केंद्रबिंदू सरकारी शाळांची स्थिती सुधारणे हा असेल, असे सीजेपीकडून सांगण्यात आले आहे. गावातील शाळांमध्ये नेमक्या कोणत्या सुविधा आहेत, कोणत्या सुविधा उपलब्ध नाहीत आणि कोणत्या बाबींमध्ये सुधारणा आवश्यक आहे, याचा आढावा घेण्यासाठी नागरिक आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अभियानात गावातील सरपंच आणि स्थानिक नेतृत्वाची भूमिकाही महत्त्वाची राहणार आहे. आपल्या गावातील सरकारी शाळांची जबाबदारी स्वीकारून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी सरपंचांनी पुढाकार घ्यावा, असे दिपके यांनी म्हटले आहे.

सीजेपीने या उपक्रमाला सरपंच चॅलेंज असे नाव दिले आहे. आपल्या गावातील सरकारी शाळेची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रत्यक्ष काम करणा–या सरपंचांचा सन्मान करण्याची भूमिका पक्षाने घेतली आहे. शाळेच्या सुधारणेपूर्वी आणि सुधारणेनंतरची छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसिद्ध करून संबंधित सरपंचांच्या कामाला श्रेय दिले जाणार असल्याचे दिपके यांनी सांगितले. एका गावातील शाळा सुधारली आणि त्याचा परिणाम इतर गावांतील सरपंचांवर झाला, तर त्यातून व्यापक बदल घडू शकतो, अशी भूमिका सीजेपीने मांडली आहे. चांगल्या कामाचे उदाहरण इतर गावांसमोर ठेवून अधिकाधिक स्थानिक लोकप्रतिनिधींना शाळांच्या सुधारणेसाठी पुढे आणण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे.

सरकारी शाळांच्या परिस्थितीचा नागरिकांच्या नेतृत्वाखाली सामाजिक ऑडिट करण्याची घोषणाही उखढने केली आहे. शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि स्थानिक पातळीवर करता येणाऱ्या सुधारणांचा आढावा यावर भर दिला जाणार आहे. या अभियानात पालक, नागरिक, सरपंच आणि गावातील इतर स्थानिक नेतृत्वाने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण शैक्षणिक व्यवस्थेकडे केवळ सरकारची जबाबदारी म्हणून न पाहता समाजानेही त्यामध्ये सक्रिय भूमिका बजावावी, असा मेसेज देण्यात आला आहे.

### क्या बोलती पब्लिक? ही सुरू होणार

■ देशभरातील नागरिकांशी आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांशी थेट संपर्क साधण्यासाठी सीजेपीने क्या बोलती पब्लिक? या अभियानाचीही घोषणा केली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेशी संबंधित समस्या जाणून घेण्याचा आणि त्या सार्वजनिक चर्चेत आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या अभियानातून ग्रामीण सरकारी शाळांच्या प्रश्नाला देशव्यापी पातळीवर चर्चेत आणण्याचा उखढचा प्रयत्न आहे. आता या आवाहनाला देशभरातील सरपंच, पालक आणि नागरिकांकडून कितपत प्रतिसाद मिळतो आणि त्यातून प्रत्यक्ष शाळांच्या सुविधांमध्ये किती बदल घडतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### मुस्कटदाबी

लोकशाहीचा अनादर
अधिवेशन गुंडाळून
उपयोगच होत नसतो
किती दुरूस्त्या धुंडाळून
चर्चेविना मंजूर होतात
विधेयक इथे सारे
घोषणांच्या गदारोळात
हुकूमशाहीचे वाहते वारे

## SPOT NEWS

### बस स्थानके होणार ‘आयकॉनिक’

**मुंबई –** महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या जागांचा सार्वजनिक–खासगी भागीदारीच्या माध्यमातून विकास करताना त्या ठिकाणी उभारण्यात येणारी नवीन बसस्थानके आणि इतर वास्तू केवळ आधुनिक सुविधांनी युक्त न राहता ‘आयकॉनिक’ आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या असाव्यात तसेच नागरिकांना सुविधा मिळाव्यात हे पाहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे एसटीच्या जागा पीपीपी तत्त्वावर विकसित करण्यासंदर्भात विशेष आढावा बैठक संपन्न झाली. याप्रसंगी परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रवाशांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा देतानाच एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या मालमत्तांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### राज्यात दूध महागले, दही, तूप, पनीरही महागणार

**मुंबई –** महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर आणखी एक भार पडला आहे. महाराष्ट्रात आज, ११ ऑगस्ट २०२६ पासून गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांनी वाढ झाली आहे. दुधाच्या दरवाढीचा परिणाम केवळ पिशवीतील दूध खरेदीवर होणार नसून दही, ताक, लोणी, पनीर, चीज, तूप, फ्लेवर्ड मिल्क आणि दुधापासून तयार होणाऱ्या मिठाईच्या किमतींवरही होण्याची शक्यता आहे. या दुग्धजन्य पदार्थांच्या दरात सुमारे १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## मुंबईत धडकणार मराठ्यांचे भगवे वादळ; जरांगे पाटलांची घोषणा

**सांगली । वीरभूमी –** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनात पुन्हा प्राण फुंकला आहे.मराठ्यांचे भगवे वादळ लवकरच मुंबईत धडकण्याची शक्यता आहे. जरागेंनी सरकारला धडकी भरवणारी घोषणा सांगली जिल्ह्यातून केली आहे. यापूर्वी एकदा वाशीच्या वेशीवर आणि नंतर आझाद मैदानात आंदोलन झाले होते.



पश्चिम महाराष्ट्रातल्या कार्यकर्त्यांसह राज्यातले मराठी बांधव आता आंतरवाली सराटीला येऊन मुंबईकडे रवाना होतील का काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे, असे मोठे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले. २९ ऑगस्ट रोजीचे आंदोलन हे मुंबईला होतंय की? काय अशी परिस्थिती सध्या निर्माण झाल्याची भावना संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे.

जी चूक केली त्याबद्दल बोला, लोकांचा रोष कमी होईल. कुणबी प्रमाणपत्र द्या. सरकारने मराठा समाजाला प्रचंड हिणवले आहे. ३ वर्षात किती मोर्चे झाले आणि या काळात काय दिले असा सवाल त्यांनी केला. मराठा समाजाचा पुन्हा मुंबईला जाण्याचा देखील विचार आहे. मला अनेक मराठा नेत्याच्या फोन येतो, आमदार,खासदार फोन करून तुम्ही म्हणताय ते पटते असे सांगतात, राणेंसारखे अनेक मराठा नेते आता बोलू लागले आहेत, याचे स्वागत आहे. सरकारचा माज उतरवणार असल्याचे ते म्हणाले.

## थकीत कर्ज थेट जामीनदारांकडून वसुलीचा बँकांना पूर्ण अधिकार : अलाहाबाद खंडपीठ

**अलाहाबाद –** मुख्य कर्जदाराने कर्जाचे हप्ते थकवल्यास, त्याच्याविरोधात प्रथम कारवाई न करता बँक थेट जामीनदाराकडून थकीत कर्जाची रक्कम वसूल करू शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती शेखर बी. सराफ आणि न्यायमूर्ती अवधेश कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने भारतीय करार कायदा, १८७२ च्या कलम १२८ चा दाखला देत स्पष्ट केले की, जामीनदाराच्या उत्तरदायित्वाची जबाबदारी ही मूळ कर्जदाराएवढीच असते. त्यामुळे बँक मूळ कर्जदार आणि जामीनदार या दोघांवर एकाच वेळी किंवा कोणा एकावरही कारवाई करण्यास स्वतंत्र आहे.

यूपी पोस्टल प्रायमरी को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडमधून विक्रांत दुबे या कर्मचा–याने २०२२–२३ दरम्यान सणासुदीचे कर्ज, अल्पमुदतीचे कर्ज आणि वैयक्तिक कर्ज अशी एकूण साडेएकवीस लाख रुपयांची कर्जे घेतली होती. त्याचे दोन सहकारी कर्मचारी या कर्जासाठी जामीनदार राहिले. विक्रांत याने कर्जाची परतफेड न केल्याने बँकेने त्याच्यासह दोन्ही जामीनदारांविरोधात एकाच वेळी वसुलीची प्रक्रिया सुरू केली.

बँकेने जामीनदारांच्या टपाल विभागाला पत्र लिहून दोन्ही जामीनदारांच्या पगारातून प्रत्येकी १०,००० रुपये महिना वसूल करण्याची विनंती केली होती. या कारवाईविरोधात दोन्ही जामीनदारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

याचिकाकर्त्यांनी न्यायालयात दावा केला की, बँकेने प्रथम मुख्य कर्जदाराविरोधात सर्व कायदेशीर मार्ग अवलंबले पाहिजेत. तेथून रक्कम वसूल न झाल्यास उरलेल्या रकमेसाठीच जामीनदाराकडे जाणे योग्य ठरेल. दोन्ही पक्षांवर एकाच वेळी वसुलीची कारवाई करणे हे जामीनकीच्या तत्त्वांविरुद्ध आहे, असा युक्तिवाद त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या राम किशन विरुद्ध यु.पी. राज्य खटल्याचा संदर्भ देऊन केला. तसेच, १५ एप्रिल २०२६ च्या वसुली पत्रापूर्वी कोणतीही सुनावणी न मिळाल्याने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचा भंग झाल्याचा दावाही त्यांनी केला.

न्यायमूर्ती शेखर बी. सराफ आणि न्यायमूर्ती अवधेश कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायालयाने स्पष्ट केले की, करार कायद्याच्या कलम १२८ नुसार जामीनदाराची जबाबदारी ही मूळ कर्जदाराएवढीच आणि तात्काळ स्वरूपाची असते. बँक ऑफ बिहार, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट बँक ऑफ इंडिया यांच्याशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा दाखला देत न्यायालयाने स्पष्ट केले की, जामीनदाराकडून वसुली करण्यापूर्वी मूळ कर्जदाराविरोधातील सर्व मार्ग संपवणे बँकेसाठी बंधनकारक नाही.


# कंटेनरच्या धडकेने घडला भीषण अपघात; दोघांचा दुर्दैवी मृत्यू

## शिरूर बायपासजवळ कार, दुचाकी व बसची धडक । उद्योजक किशोर यादव यांचा मृतांमध्ये समावेश

**पारनेर । वीरभूमी –** पुणे–अहिल्यानगर महामार्गावर शिरूर बायपासजवळ मंगळवारी (दि. ११ ऑगस्ट) सायंकाळी कंटेनर, कार, दुचाकी आणि बस अशा चार वाहनांचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये वाडेगव्हाण येथील उद्योजक किशोर यादव यांचा समावेश असल्याची माहिती समोर आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शिरूर बायपासजवळ हॉटेल संग्राम समोर महामार्गावर चार वाहनांची अचानक धडक झाली. कंटेनर, फोर्ड





एन्डेव्हर कार, दुचाकी आणि बस या वाहनांचा अपघातात समावेश होता. धडक इतकी जोरदार होती की वाहनांचे मोठे नुकसान झाले.ज्यात आधी कंटेनर ने फोर्ड एन्डेव्हर कार ला मागून धडक दिली फोर्ड एन्डेव्हर कार ने पुढे उभ्या असलेल्या मोटारसायकल ला धडक दिली व कंटेनर ने मागून दिलेली धडक इतकी जोरदार होती की मोटारसायकल व फोर्ड एन्डेव्हर कार दोन्हीही दुसऱ्या



बाजूने समोरून येणाऱ्या बस ला धडकून हे दुर्दैवी घटना घडली हे या अपघाताचा थरकाप उडवणारा १८ सेकंदांचा व्हिडिओ समोर आला असून, अपघाताची तीव्रता त्यातून स्पष्ट होत आहे. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला.

फोर्ड एन्डेव्हर कारचे चालक आणि दुचाकीस्वाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये वाडेगव्हाण (ता. पारनेर) येथील प्रसिद्ध उद्योजक किशोर यादव यांचा समावेश आहे.



अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहनांच्या रांगा लागल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेत पंचनामा करण्याची कार्यवाही सुरू केली तसेच अपघातग्रस्त वाहने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

दरम्यान, अपघातानंतर कंटेनर चालक कंटेनरसह घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे. त्यामुळे अपघात नेमका कशामुळे झाला, कंटेनरची भूमिका काय होती आणि चालक कोण होता, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

शिरूर परिसरातून पुणे–अहिल्यानगर मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे या मार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीही शिरूर परिसरात कंटेनर आणि कारच्या भीषण धडकेत जीवितहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

# SPOT NEWS

## शास्त्रीनगर शाळेच्या चार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश; आरव काळे प्रथम

**● शेवगाव । वीरभूमी –**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शास्त्रीनगरच्या चार विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत आरव जयदीप काळे याने २५४ गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. आरोही महेश जगताप आणि अंश संदिप निकाळजे यांनी प्रत्येकी २२८ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. मानव दिपक ढोले याने २२० गुण मिळवत यश संपादन केले. ग्रामीण व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत सातत्यपूर्ण अभ्यास, सराव आणि मेहनतीच्या जोरावर मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेताना वर्गशिक्षक प्रसाद सोनवणे यांनी सातत्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू घनवट, मुख्याध्यापिका रोहिणी चौरे आणि केंद्रप्रमुख रत्ना वैष्णव यांनी यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्या वतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात पार पडली. मंडळाचे अध्यक्ष साहेबराव काते यांच्या मार्गदर्शानाखाली निघालेल्या शोभायात्रेत पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज व भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. साहेबराव काते हे महालक्ष्मीचे भक्त असून, सालाबाद प्रमाणे दरवर्षी ते यात्रा उत्सवाचे आयोजन करुन, शोभायात्रा काढत असतात. या सोहळ्याचे हे २५ वे वर्ष असून. या शोभायात्रेचे प्रारंभ लालटाकी भारस्कर कॉलनी येथून झाले. पारंपारिक वाद्यांचे गजर व लक्षीमातेच्या जयघोषाने परिसर दणाणून निघाला. सर्जेपुरा, दिल्लीगेट, न्यु आर्टस महाविद्यालय मार्गे लालटाकी येथील लक्ष्मीमाता मंदिरात या शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा भाविकांसह परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला. यावेळी साहेबराव काते, सुशिलाबाई काते, आदिनाथ काते, योसेफ काते, राजू काळुंखे, मच्छिंद्र वैरागर, बहिरुनाथ वैरागर, सागर काते, संदीप त्रिभुवन, दत्तात्रय जाधव, अलंकार भोगले, यश जाधव, अनिता जाधव, आशाबाई मोहिते, सुनिल वैरागर, कार्तिका वाघमारे, भारती कुचेकर, गुनाबाई भोसले, भाग्यश्री मोहिते, संगिता कांबळे, सिताबाई वडागळे आदीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संगमनेर येथील झाडाच्या पारावरील
# शिलालेखातून १७९५ मधील इतिहास उजेडात

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

प्रवरा व म्हाळुंगी नदीच्या संगमाजवळील अच्युतनगर परिसरात एका झाडाच्या दगडी गोलाकार पारावर अठराव्या शतकातील महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. उठाव स्वरूपातील हा पाच ओळींचा शिलालेख देवनागरी लिपीत असून मराठी भाषेत कोरलेला आहे. वातावरणाच्या परिणामामुळे काही अक्षरे झिजली असली तरी छाप घेतल्यानंतर लेख सहज वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन :**

**१.शके १७१७ राक्षेस नाम**

**२.संवत्सरे आखाड वद्ये**

**३.५ ते दिवसी पार. गोविंद**

**४.राव दीक्षित पटवर्धन पं५.त शुभारअंभ केला.**

शिलालेखानुसार शके १७१७, राक्षस नाम संवत्सर, आषाढ वद्य पंचमी, म्हणजेच ७ जुलै १७९५, मंगळवार या दिवशी गोविंदराव दीक्षित पटवर्धन पंत यांनी पाराच्या बांधकामाचा शुभारंभ केला.

त्या काळात वड, पिंपळ, उंबर आदी वृक्षांभोवती पार बांधण्याची परंपरा होती. धार्मिक श्रद्धेबरोबरच गावकऱ्यांच्या बैठका, सामाजिक चर्चा तसेच प्रवाशांना सावली व विश्रांती मिळण्यासाठी पाराचा उपयोग होत असे. त्यामुळे हा शिलालेख तत्कालीन सामाजिक जीवन, लोकहितकारी बांधकाम व वृक्षसंवर्धनाच्या परंपरेचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो.

हा शिलालेख संगमनेर शहरातील अच्युतनगर येथील झाडाच्या पारावर आहे. यातील लिपी व भाषा ही देवनागरी असून इ.स. १७९५ या मराठीकालातील शिलालेख आहे. याचे संशोधन व वाचन अनिल किसन दुधाणे यांनी केले असून भरत पडवळ, भगवान घोडेकर यांनी सहकार्य केले आहे.



## अंगणवाडी सेविकांचे प्रश्न मार्गी लावणार

### केंद्रीय राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांचे आश्वासन



**● अकोले । वीरभूमी–**

केंद्रीय महिला व बालविकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांची महाराष्ट्र राज्य साईश्रद्धा अंगणवाडी महिला संघटनेच्या प्रतिनिधींनी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या उपस्थितीत भेट घेऊन अंगणवाडी सेविकांच्या विविध प्रश्नांबाबत निवेदन सादर केले. यावेळी मंत्री ठाकूर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत अंगणवाडी सेविकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

महाराष्ट्र अंगणवाडी महिला संघटनेच्या अध्यक्षा सुमन सप्रे, सचिव स्मिता औटी आणि आशा बुधवंत यांच्या शिष्टमंडळाने खासदार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्री ठाकूर यांची भेट घेतली. यावेळी अंगणवाडी सेविकांना मानधनाऐवजी वेतन लागू करणे, ग्रॅच्युइटी व पेन्शन देणे, तसेच नवीन अंगणवाड्या सुरू करणे आदी मागण्या मांडण्यात आल्या.

या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेऊन त्या मार्गी लावण्याचे आश्वासन मंत्री सावित्री ठाकूर यांनी खासदार वाकचौरे व शिष्टमंडळाला दिले.

## महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य; विनयभंगाचा तपास ४८ तासांत पूर्ण

### श्रीगोंदा पोलिसांची जलद कारवाई । आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र रवाना

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत श्रीगोंदा पोलिसांनी विनयभंगाच्या गुन्ह्याचा तपास अवघ्या ४८ तासांत पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र रवाना केले. पोलिसांच्या या जलद कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

६ ऑगस्ट २०२६ रोजी तांदळी ते आढळगाव रस्त्यावर एका महिलेचा विनयभंग झाल्याची घटना घडली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गु.र.नं. ७६१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६(२), ७४, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी दत्तात्रय राजाराम वाडेकर (रा. वडाळी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) याला अटक केली. तपासादरम्यान पीडित महिला व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करून उपलब्ध तांत्रिक व परिस्थितीजन्य पुरावे संकलित करण्यात आले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने वेगाने तपास पूर्ण केला. गुन्हा दाखल झाल्यापासून ४८ तासांच्या आत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र तयार करून रवाना करण्यात आले.

महिलांवरील अत्याचार व गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नसून, अशा गुन्ह्यांचा तपास प्राधान्याने व जलदगतीने करून आरोपींना कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी पोलिस दल कटिबद्ध आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा छळ किंवा गैरप्रकार घडल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले आहे.

ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजित कुमार शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. तपास पथकात सफौ. दत्तात्रय शिरसाठ, पोकॉ. देविदास पळसे, पोकॉ. राहुल मोढळे, पोकॉ. महादेव नवसरे व मपोकॉ. गीतांजली लाड यांचा सहभाग होता.

## पारनेरच्या सेवाधाऱ्यांची ‘मधुबन’मध्ये समर्पित आध्यात्मिक सेवा

### माऊंट आबू येथील ब्रह्माकुमारीजच्या मुख्यालयात साधकांचा सहभाग



**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रातील हिराबाई मगर, गजराबाई औटी, संगीता शेळके, संगीता खोडदे, सुशीला माता आणि लीलावती काळे या सेवाधाऱ्यांचा विशेष गट राजस्थानमधील माऊंट आबू येथील ब्रह्माकुमारीजच्या जागतिक मुख्यालयात समर्पित सेवेसाठी दाखल झाला आहे.

अरावली पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या माऊंट आबू येथे सेवा करण्याची संधी मिळाल्याने पारनेरच्या साधकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. येथील ‘मधुबन’ हे ब्रह्माकुमारीजचे मुख्य आध्यात्मिक केंद्र असून, देश-विदेशातून अनेक साधक येथे आध्यात्मिक साधना व सेवेसाठी येतात.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयामार्फत जगभरात शांतता, सकारात्मक विचार आणि आध्यात्मिक जीवनशैलीचा संदेश दिला जातो. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामविकास, तणावमुक्त जीवनशैली, शिक्षण, वैद्यकीय सेवा, व्यसनमुक्ती अभियान आणि योगिक शेती यांसारखे विविध उपक्रम राबवले जातात.

धकाधकीच्या जीवनात सुख, समाधान आणि मानसिक शांतता मिळावी यासाठी विद्यालयात ‘राजयोगा’चा अभ्यास केला जातो. सकारात्मक विचार आणि नियमित राजयोगाच्या माध्यमातून आत्मिक शक्ती, शांतता, आनंद, प्रेम, पवित्रता, ज्ञान व शक्ती या गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

या सेवेदरम्यानचा अनुभव सांगताना पारनेरच्या सेवाधाऱ्यांनी अरावलीच्या शांत, निसर्गरम्य वातावरणामुळे मनाला वेगळीच ऊर्जा आणि समाधान मिळत असल्याचे सांगितले. येथे मिळणारा आध्यात्मिक अनुभव स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील दुःखी व अशांत व्यक्तींना सकारात्मक जीवनाची प्रेरणा देण्यासाठी उपयोगी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पारनेर केंद्रातील सेवाधाऱ्यांच्या या समर्पित सेवेमुळे आध्यात्मिक साधनेसह समाजसेवेचा संदेश अधिक व्यापक करण्यास प्रेरणा मिळत आहे.

# विकासकामांच्या दर्जाबाबत तडजोड नाही; कामे वेळेत पूर्ण करा

### खालचा गणपती ते मौलाना आझाद चौक रस्त्याच्या कामाची नगरसेविका दिपाली बंग यांनी केली पाहणी



> प्रभागातील विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड मान्य केली जाणार नाही. कामे तांत्रिक निकषांनुसार, दर्जेदार साहित्याचा वापर करून आणि ठरलेल्या वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. नागरिकांना चांगल्या दर्जाचे रस्ते व मूलभूत सुविधा मिळणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे.
>
> **– सौ. दिपाली बंग,** नगरसेविका

**● पाथर्डी । वीरभूमी –**

नगरपरिषद हद्दीतील विकासकामांना गती देतानाच कामांचा दर्जा कायम राखण्यासाठी नगरसेविका सौ. दिपाली रामनाथ बंग यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पाहणी केली. त्यांच्या मागणीनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती मलनिस्सारण योजनेअंतर्गत सुरू असलेल्या खालचा गणपती ते मौलाना आझाद चौक रस्त्याच्या पहिल्या लेयरच्या कामाची त्यांनी पाहणी करून संबंधित अधिकारी व ठेकेदाराच्या प्रतिनिधींना आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी नगरपरिषदेचे अभियंता विशाल मढवई, माजी नगरसेवक रामनाथ बंग, प्रकल्प व्यवस्थापक हंसराज जडेजा, योजनेचे पर्यवेक्षक मानस पाल तसेच संबंधित कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

रस्त्याच्या कामाची पाहणी करताना नगरसेविका बंग यांनी बांधकाम साहित्य, रस्त्याची स्थिती, कामाची तांत्रिक पद्धत, लेयरची गुणवत्ता आणि एकूण कामाचा दर्जा यांची बारकाईने पाहणी केली. त्यांनी संबंधितांकडून कामाची माहिती घेत कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा दर्जाबाबत तडजोड सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट केले.

रस्त्याचे काम तांत्रिक निकषांचे पालन करून नियमानुसार करण्यात यावे. तसेच नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने कामाला गती देऊन ते निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

प्रभागातील विकासकामे नागरिकांच्या पैशातून आणि त्यांच्या सुविधेसाठी होत असल्याने गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही. विकासकामे केवळ घाईघाईने किंवा कागदावर पूर्ण न करता दीर्घकाळ टिकणारी व नागरिकांच्या उपयोगाची असावीत, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे नगरसेविका बंग यांनी सांगितले.

मलनिस्सारण योजनेच्या कामामुळे रस्त्यांची कामे प्रभावित होत असली तरी संबंधित विभागांनी समन्वयाने कामे पूर्ण करून नागरिकांना होणारा त्रास कमी करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

वीरभूमी

हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या वतीने युवक-युवतींना नशा मुक्तीचा संदेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मानवता हाच एक धर्म सामाजिक संस्था व नेक्स्ट लेव्हल फिटनेसच्या माध्यमातून युवक-युवतींना सकारात्मक दिशा देत नशेपासून दूर राहण्याचा आणि आरोग्य-क्रीडा क्षेत्रात आपले करिअर घडविण्याचा संदेश देण्यात आला. तर राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सन्मान मानवता हाच एक धर्म संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांच्या हस्ते करण्यात आला. अल्ताफ सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांमध्ये आरोग्य, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच सकारात्मक विचारांना बळ देणाऱ्या नेक्स्ट लेव्हल फिटनेस जिममध्ये युवक-युवतींना केवळ व्यायामाची सुविधा नाही, तर क्रीडा क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या जिममध्ये प्रशिक्षण घेतलेल्या अनेक युवकांनी नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संस्थापक डेव्हिड मकासारे यांनी युवक-युवतींना प्रेरणादायी संदेश देताना सांगितले की, तरुणाईमध्ये प्रचंड ऊर्जा आणि क्षमता आहे. या ऊर्जेला योग्य दिशा दिली, तर प्रत्येक युवक आपल्या आयुष्यात मोठे यश मिळवू शकतो. मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले. अल्ताफ सय्यद यांनी युवक-युवतींना नशेच्या आहारी न जाण्याचे आवाहन केले. ड्रग्ज, एमडीसारख्या अमली पदार्थांच्या आहारी जाऊन आपले आयुष्य उद्ध्वस्त करू नका. नशा तुमचे आरोग्य, करिअर आणि कुटुंबाचे भविष्य हिरावून घेऊ शकते. त्याऐवजी व्यायाम करा, खेळा आणि आपल्या ध्येयासाठी दिवस-रात्र मेहनत करा, असा संदेश त्यांनी दिला. युवक ही देशाची ताकद आहे. तुमच्या हातात नशेची पुडी नव्हे, तर यशाची ट्रॉफी दिसली पाहिजे. शरीर निरोगी असेल, मन सकारात्मक असेल आणि ध्येय निश्चित असेल तर यशाची शिखरे गाठणे निश्चित शक्य असल्याचे सांगितले.

## प्रगतिशील शेतकरी दिनकर गंगाराम बडे यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील चिंचपूर पांगूळ येथील प्रगतिशील शेतकरी



दिनकर गंगाराम बडे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिंचपुर पांगुळ येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या आकस्मित निधनाने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे. दिनकर बडे हे अत्यंत साधे, कष्टकरी आणि धार्मिक वृत्तीचे व्यक्तिमत्त्व होते. शेती आणि कुटुंबाला प्राधान्य देत त्यांनी सामाजिक सलोखा नेहमी जपला. अनेकांसाठी ते मार्गदर्शक व प्रेरणास्थान होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, मुली, भाऊ, भावजय, पुतणे, पुतणी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार सोमराज बडे यांचे ते वडील होत.

# पारनेरच्या समस्यांवर नगरसेवक अशोक चेडेंचा इशारा

**कचरा, गढूळ पाणी, खड्डे व रखडलेल्या कामांवर प्रशासन धारेवर । १८ ऑगस्टला 'जागरण-गोंधळ' आंदोलनाचा इशारा**

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहरातील विविध प्रलंबित नागरी प्रश्न आणि मूलभूत सुविधांच्या अभावाकडे नगरपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नगरसेवक अशोक चेडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शहरातील वाढता कचरा, गढूळ पाणीपुरवठा, रखडलेली विकासकामे आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली आहे. प्रश्न मार्गी न लागल्यास १८ ऑगस्ट २०२६ रोजी नगरपंचायतीसमोर 'जागरण-गोंधळ' आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी प्रियांका शिंदे आणि नगराध्यक्षा विद्या कावरे यांच्या उपस्थितीत नगरसेवक चेडे यांनी प्रशासनाला सविस्तर निवेदन दिले. त्यामध्ये शहरातील विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरातील नागरिकांना गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जागोजागी साचलेला कचरा, फुटलेल्या ड्रेनेज लाईन्समुळे निर्माण झालेले सांडपाणी, मोकाट कुत्र्यांचा उपद्रव तसेच डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे नागरिक त्रस्त असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मुख्य बाजारपेठेतील रस्त्यांवरील मोठे खड्डे, विस्कळीत वीज व्यवस्था, नागरिकांच्या विरंगुळ्याचे केंद्र असलेल्या नागेश्वर गार्डनचे रखडलेले काम आणि दशक्रिया विधी घाटावरील अतिक्रमणे या प्रश्नांकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यावेळी नगरसेवक अशोक चेडे म्हणाले, पारनेरकरांच्या मूलभूत प्रश्नांकडे आणि आरोग्याशी निगडित समस्यांकडे आता आणखी दुर्लक्ष सहन केले जाणार नाही. नागरिकांना केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष ठोस कामाची अपेक्षा आहे. प्रशासनाने या समस्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदन देऊनही ठोस कार्यवाही न झाल्यास १८ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर नगरपंचायतीसमोर तीव्र स्वरूपाचे 'जागरण-गोंधळ' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा चेडे यांनी दिला आहे. या इशाऱ्यामुळे पारनेरच्या प्रशासकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे.

## शेवगावात उद्या भव्य 'तिरंगा पदयात्रा'

**आ. मोनिकाताई राजळे, माजी सैनिक, एनसीसी पथकांसह विविध संघटनांचा सहभाग**

**● शेवगाव । वीरभूमी–**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शेवगाव शहरात गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांच्या वतीने भव्य 'तिरंगा पदयात्रे'चे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय सोहळ्यात तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पदयात्रेला गुरुवारी सकाळी ८.३० वाजता क्रांती चौक (बस स्टँड चौक) येथून सुरुवात होईल. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि संत गाडगेबाबा चौक मार्गे पदयात्रा तहसील कार्यालयाच्या आवारात पोहोचेल. तेथे पदयात्रेचा भव्य समारोप होणार आहे.

या सोहळ्यास शेवगाव मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजळे, माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, एनसीसी पथक तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. शहरातील विविध सामाजिक संघटना आणि शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थीही पदयात्रेत शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होणार आहेत.

नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करणे हा पदयात्रेचा मुख्य उद्देश आहे. शेवगाव शहर व परिसरातील नागरिक, युवक, राष्ट्रप्रेमी तसेच माता-भगिनींनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक व राष्ट्रप्रेमी नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रीगोंद्यात स्थानिक गुन्हे शाखेने १ लाख १० हजारांचा गुटखा पकडला

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शहरातील अवैध सुगंधी तंबाखू व मावा विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत सहा आरोपींविरुद्ध तीन गुन्हे दाखल करून तब्बल १ लाख १० हजार ९७६ रुपयांचा पानमसाला व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंदा पोलिसांच्या हद्दीत अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांची माहिती घेत कारवाईचे नियोजन केले. त्यानुसार १० ऑगस्ट रोजी तीन वेगवेगळ्या ठिकाणी पंचांसमक्ष छापे टाकण्यात आले.

या कारवाईत स्वप्नील भिमराव कवडे, बन्सी गंगाधर काळे आणि अल्ताफ गुलाब मुजावर यांच्यासह सहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील काही आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. जप्त मुद्देमालाची किंमत अनुक्रमे ६३ हजार १६ रुपये, ३५ हजार ८६० रुपये आणि १२ हजार १०० रुपये आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक संतोष मुटुकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार गणेश लोंढे, अमोल कोतकर, मनोज साखरे, प्रताप देवकाते, सुनील मालणकर व बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने केली.

## धीरज परदेशी हत्येच्या निषेधार्थ शेवगाव बंदला व्यापाऱ्यांचा प्रतिसाद; सूत्रधाराचा शोध घेण्याची मागणी

**● शेवगाव । वीरभूमी–**

मुकुंदनगर येथे झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने शेवगाव बंदची हाक देण्यात आली. व्यापारी, व्यावसायिक तसेच नागरिकांनी या बंदला प्रतिसाद दिल्याने शहरातील प्रमुख बाजारपेठेसह दुकाने व व्यावसायिक आस्थापना दिवसभर बंद राहिल्या.

या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावी. तसेच हल्ल्यामागील सूत्रधार व मास्टरमाइंडचा शोध घेऊन त्यांच्यावरही कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भात सकल हिंदू समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी शेवगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांची भेट घेऊन निवेदन दिले. या प्रकरणाचा निष्पक्ष, सखोल व पारदर्शक तपास करावा, हल्ल्यात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करावी, तसेच आरोपींना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या व्यक्तींचीही चौकशी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तपासादरम्यान कायदेशीर प्रक्रियेनुसार संबंधित आरोपींच्या घरांची व मालमत्तेची झडती घेऊन आवश्यक ती कारवाई करावी. या प्रकरणातील प्रत्येक आरोपीपर्यंत पोहोचून हल्ल्यामागील नेमके कारण आणि सूत्रधाराचा शोध घेणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि संवेदनशील ठिकाणी पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बंददरम्यान शहरातील बहुतांश व्यवहार बंद राहिल्याने नेहमी गजबजलेल्या बाजारपेठेत दिवसभर शांतता दिसून आली.

## संत सावता महाराज, संत नामदेव महाराज व सद्‌गुरू ओकबाबा पुण्यतिथीनिमित्त शेडगावात रक्तदान शिबिर उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्री संत शिरोमणी सावता महाराज, संत नामदेव महाराज व सद्गुरू ओकबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानिमित्त शेडगाव येथे सोमवार दि.१० रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री दत्त मंदिर सभामंडपात झालेल्या या शिबिरात एकूण ५२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.



हरीनाम सप्ताहाच्या निमित्ताने सात दिवस नामांकित कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली होती. या काळात ग्रामस्थांच्या वतीने दररोज महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले. काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी दादाभाऊ क्षीरसागर, भाऊसाहेब खामकर, बिभीषण राऊत, ज्ञानदेव बेल्हेकर व डॉ. गिरमे यांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांचा उत्साह वाढविण्यासाठी आयोजकांच्या वतीने प्रत्येक रक्तदात्यास हेल्मेट व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. माजी सरपंच विजय शेंडे यांच्या हस्ते रक्तदात्यांना हेल्मेट व प्रशस्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे या भावनेतून माजी सरपंच विजय शेंडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धार्मिक सप्ताहाला सामाजिक उपक्रमाची जोड देत रक्तदानासारख्या विधायक कार्यातून यावेळी समाजोपयोगी संदेश देण्यात आला.

# जिल्हाधिकारी कार्यालया समोर विविध मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

**राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने चेतना दिन व मागणी दिन साजरा**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनानुसार आज ११ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी एकत्र येत चेतना दिन व मागणी दिन एकजुटीने साजरा केला. विविध मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली.

या आंदोलनात संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय काकडे, भाऊ शिंदे, सुनील आहेर, सहचिटणीस संदिपान कासार, पुरुषोत्तम आडेप, सागर गायकवाड, मुकुंद शिंदे, मंजुषा बागडे, सी.पी. नोडके, सोनाली वडणे, मनीषा ओहोळ, एस.एम. वैद्य, लता गायकवाड, भाऊसाहेब डमाळे, वासुदेव राक्षे, अमीन इनामदार, विश्वेश्वर खेडेकर, दीपक चन्ने, वृषाली करोसिया, सुरेश जेढे, अमर शिंदे, सौरव बोठे, रेणुका येंबारे, कदम मॅडम, बोडके मॅडम आदींसह सरकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

११ ऑगस्ट १९६६ हा दिन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या जीवनातील संघर्षाचा आरंभिक टप्पा होता, ज्याच्या स्मृतीस उजाळा देत आजचा हा दिवस कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या लढ्यासाठी महत्त्वाचा ठरला. या पार्श्वभूमीवर चेतना दिन व मागणी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशासनासमोर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांचा आग्रह धरण्यात आला.

१ मार्च २०२४ पासून आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या व सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यांना योजना अंमलबजावणीचे अंतिम आदेश येईपर्यंत तात्पुरते निवृत्ती वेतन तात्काळ देण्यात यावी, चतुर्थश्रेणी व वाहन चालक पदांसह सर्व रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावीत, सेवानिवृत्तीची मर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, कंत्राटी व रोजंदारी कामगारांना व्यापक कॅशलेस विमा योजना लागू करावी आणि लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना अपेक्षित वेतन वृद्धीचा लाभ मिळण्यासाठी योग्य उपाययोजना करावी, अशा प्रमुख मागण्यांसाठी हा लढा पुकारण्यात आला आहे. या आंदोलनामध्ये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी वर्ग उत्साहाने सहभागी झाले होते.



# रामगिरी बाबा टेकडीचे विद्रूपीकरण नागरिकांच्या जीवाशी खेळणारे

## तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय उत्खनन | काम तातडीने थांबवून तज्ज्ञांचा अहवाल घेण्याची डॉ. दीपक देशमुख यांची मागणी

**● पाथर्डी | वीरभूमी–**
शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या रामगिरी बाबा टेकडीचे विकासकामांच्या नावाखाली बेकायदा उत्खनन करून पालिकेने हजारो नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण केला आहे. टेकडीतील मुरमाचा तज्ज्ञांकडून अभ्यास न करताच मनमानी पद्धतीने उत्खनन करण्यात येत असून, निसर्गसंपदेची हानी केली जात असल्याचा आरोप निसर्ग व जैवविविधता अभ्यासक तथा माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख यांनी केला आहे. महसूल विभागाने हस्तक्षेप करून उर्वरित काम तातडीने थांबवावे, अशी मागणी त्यांनी प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्याकडे केली आहे.

याबाबत बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, अनेक पिढ्यांपासून रामगिरी बाबा टेकडी शहराच्या निसर्गसंपदेचे रक्षण करण्यासोबतच पाणी अडविण्याचे काम करत आहे. कच्चा व घट्ट मुरूम असलेली ही उंच टेकडी शहराच्या वैभवात भर घालणारी आहे. पाणीपुरवठा विभागाच्या पाण्याच्या टाक्याही याच टेकडीवर आहेत. यापूर्वी पर्यटन व सुशोभीकरणाच्या नावाखाली पालिकेने टेकडीवर कोट्यवधी रुपये खर्च केले; मात्र त्या खर्चाचा ठोस परिणाम दिसत नाही. आता पुन्हा पर्यटनाच्या नावाखाली टेकडीच्या मजबूत भागाचे अत्याधुनिक यंत्रसामग्रीने उत्खनन करून तिची उंची, रुंदी व नैसर्गिक क्षमता कमी केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

टेकडीच्या तीनही बाजूंना नागरी वसाहत असून, लकार गल्लीच्या बाजूने नदीपर्यंत असलेला उतार तिची रचना स्पष्ट करतो. संततधार पाऊस, छोटा भूकंप किंवा भूस्खलन झाल्यास मोठी दुर्घटना घडून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती डॉ. देशमुख यांनी व्यक्त केली.

पालिकेकडे पर्यावरणतज्ज्ञ, भू-अभ्यासक व जलतज्ज्ञ नसल्याने पूर्वी अशा विकासकामांपूर्वी तज्ज्ञांचे मत घेतले जात होते. मात्र आता पालिका प्रशासनच सर्व भूमिका पार पाडत असून, पदाधिकारी व नेतेही प्रशासनाच्या हातचे बाहुले बनल्याचा आरोप त्यांनी केला. टेकडीचे उत्खनन शहराच्या सौंदर्यासाठी करण्यात आले की ठेकेदारांच्या फायद्यासाठी, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनीही यापूर्वी या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र त्यांना समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. शहरातील निसर्गप्रेमी व टेकडीवर प्रेम करणाऱ्या नागरिकांना आता विकासकामांचा जाब विचारण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, असे डॉ. देशमुख म्हणाले.

पालिकेच्या विविध विकासकामांतील नियोजनशून्यतेवरही त्यांनी टीका केली. गटार, रस्ता व पाणीपुरवठा कामांमध्ये वारंवार खोदकाम आणि पुन्हा रस्ते करण्याचे प्रकार सुरू असून, जनतेच्या पैशाचा योग्य वापर होत आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. वृक्षारोपणासह विविध कामांबाबतही पारदर्शकता आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



सक्षम अधिकारी व पर्यावरणतज्ज्ञांनी रामगिरी बाबा टेकडीवरील कामाची पाहणी करून वस्तुस्थितीचा अहवाल द्यावा. महसूल प्रशासनाने तातडीने तज्ज्ञांचा अहवाल मागवून पुढील काम थांबवावे. अन्यथा न्यायालयीन प्रक्रिया करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशारा डॉ. दीपक देशमुख यांनी दिला.

# सरकारी दिशादर्शक फलक झाकून आमदारांचा वाढदिवस; कार्यकर्त्यांचा अजब कारभार

## नाना शिंदे यांचे तहसीलदारांना निवेदन | फलक हटवून संबंधितांवर कारवाईची मागणी

**● श्रीगोंदा | वीरभूमी–**
तालुक्यातील पारगाव फाटा येथे नागरिकांच्या सोयीसाठी लावण्यात आलेला सरकारी दिशादर्शक फलक गेल्या वर्षभरापासून झाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या फलकावर आमदारांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांचे फोटो लावण्यात आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

श्रीगोंदा शहराची झपाट्याने वाढ होत असून शहराची लोकसंख्याही मोठी आहे. पारगाव फाट्यावरून कर्जत, करमाळा व जामखेडकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी हा दिशादर्शक फलक महत्त्वाचा आहे. मात्र, फलक झाकण्यात आल्याने बाहेरून येणाऱ्या नागरिकांसह वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे.

हा रस्ता व दिशादर्शक फलक पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित होता. सध्या हा रस्ता महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MSIDC) कडे वर्ग करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



सामाजिक कार्यकर्त्यांनी यापूर्वी आमदारांसह संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोशल मीडिया व विविध माध्यमांतून हा प्रकार निदर्शनास आणून दिला होता. मात्र, अद्यापही फलकावरील अडथळा दूर करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात आले.

याबाबत संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे यांनी तहसीलदार सचिन डोंगरे यांना निवेदन दिले आहे. सरकारी दिशादर्शक फलक तातडीने मोकळा करावा तसेच सरकारी फलकाचा अशा प्रकारे वापर करून त्यावर फोटो लावणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# बालसंगोपन योजनेची पडताळणी व चौकशी अकोल्यातच करा

## अहिल्या एकल हक्क संरक्षण समितीची आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याकडे मागणी

**● अकोले | वीरभूमी–**
महाराष्ट्र शासनाच्या एकल महिलांच्या मुलांसाठी शैक्षणिक खर्चासाठी राबविण्यात येणाऱ्या 'बालसंगोपन योजना' अंतर्गत लाभार्थी महिला व संबंधित व्यक्तींची चौकशी व पडताळणी अकोले येथेच करण्यात यावी, अशी मागणी अहिल्या एकल हक्क संरक्षण समिती, अकोले तालुका यांच्या वतीने आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत प्रशासनाकडेही लेखी मागणी करण्यात आली आहे.



समितीने आमदार डॉ. किरण लहामटे तसेच प्रशासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधून सविस्तर निवेदन दिले. सध्या अकोले विधानसभा मतदारसंघातील एकल महिला व त्यांच्या मुलांना बालसंगोपन योजनेसाठी चौकशी व पडताळणीकरिता अकोल्यापासून सुमारे १३० किलोमीटर अंतरावर असलेल्या अहिल्यानगर येथे जावे लागत आहे. अकोले तालुक्यातील शेवटच्या गावांमधून तसेच आदिवासी भागातून हे अंतर काही लाभार्थ्यांसाठी १७५ किलोमीटरपर्यंत जाते.

अनेक एकल महिला रोजंदारी किंवा शेतीच्या कामावर अवलंबून असल्याने त्यांना चौकशीसाठी एवढ्या दूरवर जाणे आर्थिकदृष्ट्या व व्यवहार्यदृष्ट्या कठीण ठरत आहे. प्रवासाचा खर्च, त्या दिवसाची मजुरी बुडणे तसेच लहान मुलांना सोबत घेऊन जाण्याची अडचण यामुळे योजनेचा लाभ मिळविताना महिलांना अतिरिक्त त्रास सहन करावा लागत असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे.

लाभार्थी महिलांची चौकशी व पडताळणी अकोले येथेच करण्यात आल्यास त्यांचा प्रवासखर्च वाचेल, रोजंदारी बुडणार नाही आणि स्थानिक पातळीवर आवश्यक ती चौकशी व पडताळणी सुलभपणे करता येईल, असे समितीने स्पष्ट केले.

अकोले तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागातील एकल महिला व त्यांच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा आणि संबंधित बालसंगोपन समितीची पडताळणी अकोले येथेच घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

एकत्र येऊ, आवाज उठवू – हक्क मिळवू, भविष्य घडवू! या भूमिकेतून अहिल्या एकल हक्क संरक्षण समितीने हा प्रश्न उपस्थित केला आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी समितीच्या ज्योत्स्ना देशमुख, सिंधू धोंगडे, नीता डावरे, छाया चौधरी, छाया पोटे, सुनीता पडवळ, पूजा गोसावी, सुवर्णा गडगे, ज्योती वाकचौरे, शीतल गावडे, वैशाली वाळुंज, यास्मिन शेख, नीलिमा चव्हाण आणि लीजायना शेख यांनी केली.

### या प्रश्नासाठी अदितीताई तटकरे यांची भेट घेणार : डॉ. किरण लहामटे

■ एकल महिलांच्या मुलांसाठी बालसंगोपन योजनेच्या चौकशी व पडताळणीसाठी महिलांना आणि त्यांच्या मुलांना अहिल्यानगरला दूर जावे लागते. त्यामुळे ही चौकशी व पडताळणी अकोल्यातच व्हावी, ही एकल महिलांची मागणी रास्त आहे. या संदर्भात नामदार अदितीताई तटकरे यांची भेट घेणार आहे, असे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी सांगितले.

# कर्तव्यनिष्ठ सैनिकांमुळे देशाची सीमा सुरक्षित

## आ. मोनिका राजळे | मेजर विष्णू आधाट यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात कुटुंबीयांचाही सन्मान

**● शेवगाव | वीरभूमी –**
कर्तव्यनिष्ठ सैनिकांमुळेच भारताची सीमा सुरक्षित असून देशवासीय निश्चिंत आहेत. देशातील प्रत्येक नागरिकाला भारतीय सैन्य आणि प्रत्येक जवानाचा नितांत आदर आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

जनरल रिझर्व्ह इंजिनियरिंग फोर्समध्ये प्रदीर्घ काळ देशसेवा बजावून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झालेले मेजर विष्णू नारायण आधाट यांच्या सेवापूर्ती निमित्त स्वराज मंगल कार्यालय, शेवगाव येथे आयोजित गौरव समारंभात अध्यक्षस्थानावरून आमदार राजळे बोलत होत्या.

यावेळी वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक उद्धव वाघ, प्रवरा शैक्षणिक समूहाचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर पाटील, तहसीलदार आकाश दहाडदे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, भाजपाचे तालुकाध्यक्ष महेश फलके, माजी सैनिक संघाचे शिवाजी बडे आदी उपस्थित होते.

यावेळी उद्धव वाघ, तहसीलदार दहाडदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष फलके आदींनी मनोगत व्यक्त केले. आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते मेजर विष्णू आधाट, त्यांच्या पत्नी विद्या आधाट, मुलगा सार्थक, मुलगी सायली, वडील नारायणराव आधाट आणि आई ठकूबाई आधाट यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सैनिकाच्या देशसेवेबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाचाही यावेळी गौरव करण्यात आला.

मेजर विष्णू आधाट यांनी सेवाकाळात देशाच्या विविध भागांत कर्तव्य बजावत राष्ट्रसेवेत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सेवापूर्तीबद्दल आयोजित या समारंभाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. सोमनाथ आधाट, प्रविण आधाट, सागर आधाट, अंबादास आधाट, डॉ. किरण वाघ, रमेश लव्हाट, अतिष लांडे, दीपक भडके, जनार्दन रायकर, ठकसेन तुपे, अशोक गोरे, नामदेव चेडे, कैलास बाहेती, राहुल सावंत, राहुल नांगरे, विजय काथवटे, खंडू बुलबुले, नगरसेवक गणेश कोरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश रांधवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दीपक कुसळकर यांनी केले, तर प्रा. मच्छिंद्र आधाट यांनी आभार मानले.

### सैनिक, खेळाडू व नागरिकांची मोठी उपस्थिती

■ शेवगाव सायकल असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच शेवगाव स्पोर्ट्स क्लबचे आजी–माजी खेळाडूही कार्यक्रमाला उपस्थित होते. आजी–माजी सैनिक, आधाट परिवार, मित्रपरिवार, नातेवाईक, क्रीडा क्षेत्रातील खेळाडू तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.